अकृषी विद्यापीठे व संलग्नित महाविद्यालयातील
शिक्षकेत्तर पदांना लागू असलेले महाराष्ट्र अकृषी
विद्यापीठे आणि संलग्नित महाविद्यालये
प्रमाणसंहिता (शिक्षकेत्तर पदांच्या अटी व
सेवाशर्ती) नियम, १९८४ रद्द करून त्याऐवजी
महाराष्ट्र नागरी सेवा नियमातील तरतूदी लागू
करणेबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**उच्च व तंत्र शिक्षण विभाग**
शासन पूरक पत्र क्रमांकः संकिर्ण २०१३/(८१/२०१३)/विशि-१
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२
दिनांक : ०८ एप्रिल,२०१३

वाचा : १) शासन निर्णय क्रमांक :- उच्च व तंत्र शिक्षण विभाग, संकिर्ण २०१०/(३१२/२०१०)/१/
विशि-१; दि. २० मे, २०१०

**प्रस्तावना :-** महाराष्ट्र अकृषी विद्यापीठे आणि संलग्नित महाविद्यालये प्रमाण संहिता (शिक्षकेत्तर पदांच्य अटी व सेवा शर्ती), नियम, १९८४ मधील तरतूदी दि. १ मे, १९८५ पासून अकृषी विद्यापीठे व महाविद्यालयांना लागू करण्यात आल्या होत्या. तथापि, सदर प्रमाण संहिता सुमारे २६ वर्षापूर्वीची असून त्यामध्ये आवश्यकतेनुसार अद्याप कोणत्याही सुधारणा करण्यात आलेल्या नव्हत्या, त्याचप्रमाणे वेगवेगळया विद्यापीठामध्ये कर्मचाऱ्यांना मिळणाऱ्या लाभामधील तफावतीमुळे कर्मचाऱ्यामध्ये अस्वस्था निर्माण झाली होती. या संदर्भात मा. कुलपतीकडे अनेक वेळा चर्चा होऊन अकृषी विद्यापीठे व महाविद्यालयातील शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यासाठी सामाईक परिनियम (Comman Statute) तयार करण्यात यावेत व सदर समाईक परिनियम लागू होईपर्यंत प्रमाणसंहिता नियमाच्या ऐवजी महाराष्ट्र नागरी सेवा नियम लागू करण्यात यावेत असा निर्णय घेण्यात आला. त्यानुसार दि. २० मे, २०१० रोजी शासन निर्णय निर्गमित करण्यात आलेला आहे.

अकृषी विद्यापीठे व महाविद्यालयासाठी अस्तित्वात असलेली प्रमाणसंहिता शासन निर्णय दिनांक २० मे,२०१० अन्वये रद्द केल्यानंतर अकृषी विद्यापीठातील त्यांच्या शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या भरतीसाठी

परिनियमाद्वारे सेवा प्रवेश नियम तयार केले असून त्यानुसार अकृषी विद्यापीठातील भरती प्रक्रिया सुरु आहे. संबंधित अकृषी विद्यापीठांनी किंवा यथास्थिती संचालक, उच्च शिक्षण व संचालक, तंत्र शिक्षण यांनी अकृषी विद्यापीठांशी संलग्नीत अशासकीय महाविद्यालयातील शिक्षकेत्तर पदांच्या भरती प्रक्रिये संदर्भात सेवा प्रवेश नियम तयार करणे अभिप्रेत होते. तथापि, असे सेवा प्रवेश नियम अद्यापही तयार करण्यात आले नसल्याचे शासनाच्या निर्दशनास आले आहे. त्यामुळे संदर्भाधीन दि. २० मे, २०१० शासन निर्णयास पूरकपत्र काढून अकृषी विद्यापीठांशी संबंधित अशासकीय महाविद्यालयातील शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या सेवाभरतीसाठी कोणते सेवा प्रवेश नियम वापरावेत याबाबतचे आदेश निर्गमित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

## पूरकपत्र

प्रस्तावनेत नमूद केल्याप्रमाणे राज्यातील अकृषी विद्यापीठांशी संलग्नित असलेल्या अशासकीय महाविद्यालयातील शिक्षकेत्तर पदांच्या सेवा भरती नियमांबाबत खालीलप्रमाणे शासन मान्यता देत आहे :-

(1) शासन निर्णय क्रमांक संकीर्ण् २०१०/(३१२/२०१०)/विशि १, दिनांक २० मे,२०१० च्या परिच्छेद ७(२) मध्ये विहित केलेल्या समितीची परिच्छेद ७(५) मध्ये विहित केलेली मुदत दिनांक ३० मे, २०१३ पर्यंत वाढविण्यात येत आहे.

(2) या कालावधीत समितीने अकृषी विद्यापीठांशी संलग्नीत अनुदानित महाविद्यालयातील शिक्षकेतर पदे भरण्यासाठी आवश्यक असलेले सेवा प्रवेशाचे तयार केलेले नियम किंवा अधिस्विकृत केलेले नियम शासनाकडून दिनांक ३० जून, २०१३ पर्यंत संचालक (उच्च शिक्षण) मान्य करुन घेतील.

(3) दिनांक २० मे,२०१० ते दिनांक ३० जून, २०१३ या कालावधीतील भरती महाराष्ट्र अकृषी विद्यापीठे आणि संलग्नीत महाविद्यालये प्रमाण संहिता (शिक्षकेतर पदांच्या अटी व सेवाशर्ती), नियम १९८४ मधील सेवा भरतीच्या नियमानुसार झाली असल्यास सदर भरती नियमीत असल्याचे मान्य करण्यात येत आहे. तसेच दिनांक ३० जून, २०१३ पर्यंत प्रमाण संहिते मधील तरतूदी प्रमाणे रिक्त पदे भरती करण्यास अनुज्ञेयता देण्यात येत आहे.

२. सदर शासन निर्णय महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम, १९९४ मधील कलम ८(४), कवी कुलगुरु कालिदास संस्कृत विश्वविद्यालय अधिनियम १९९७ मधील कलम ८(४), डॉ.बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ अधिनियम, १९८९ व यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ अधिनियम, १९८९ मधील तरतुदी नुसार प्रदान करण्यात आलेल्या अधिकारान्वये निर्गमित करण्यात येत आहे.

३.	सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharastra.govt.in या संकेत स्थळावर उपलब्ध व देण्यात आला असून त्यांचा संकेताक क्रमांक २०१३०४०८१४२७०५९३०८ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

( विकास तु.कदम )
कार्यासन आधिकारी, महाराष्ट्र शासन

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर - ४१६ ००४. महाराष्ट्र
(संलग्नता विभाग - २६०९०८९, २६०९१३६)
फॅक्स : ००९१-०२३१-२६९३२९४, २६९१५३३ व २६९२३३३.

संदर्भ : जा.क्र./संलग्नता/टे.१/युजीके/ 40	दिनांक : 21 JUN 2013

प्राचार्य, संलग्न महाविद्यालये व संचालक, मान्यताप्राप्त शिक्षणसंस्था यांना प्रत माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित.

संचालक,
महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळ,